।।गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकीची पन्नास वर्षे ।।

# <u>विदयापीठ गीत</u>

गीत आमुचे आकाशाचे गीत आमुचे सागराचे
इतिहासाचे जनामनाचे गीत आमुचे जागराचे

अभंगाचे ओवीचेही
मायबोलीचे माहेर
वाऱ्यातही मराठीचे
दिवे लख्ख घरोघर

संत-महंतांचे विरागी गीत आमुचे वादळाचे

तंतु तंतु संघर्षाचा
पैठणीत भिनलेला
नक्षीतच पक्षी-पक्षी
विजयाचा विणलेला

उदयाचे सोनपहाटेचे गीत आमुचे उजेडाचे

प्रज्ञेचासूर्य नवा
शब्द उजळून गेला
समतेचा संगराचा
अर्थ ढाळुन गेला

विराट विशाल संस्कृतीचे गीत आमुचे जीवनाचे

**- फ.मुं.शिंदे**